नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/06/2023 (शनिवार) सकाळ

## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

दिनांक १५/०६/२०२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक हे कन्हान उपविभागात पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय मुखबिरकडुन माहिती मिळाली की, एक इसम पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत अवैधरीत्या अग्नीशत्र बाळगून काहीतरी गंभीर गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असलेल्या रामटेक येथे राहणारा **आरोपी नामे— राहुल भारत फुलझेले वय २५ वर्ष, रा. रामटेक** हा आपले जवळ देशी कट्टा बाळगून अप्रीय घटना करण्याचे उद्देशाने डुंबरी बस स्टॉप येथे बसून आहे अशा मिळालेल्या खबरेवरून आरोपीस पकडले असता त्याला ताब्यात घेऊन पंचा समक्ष त्यांची झडती घेतली असता त्याचे अंगझडतीत एक लोखंडी देशी कट्टा किंमती अंदाजे ३०,०००/—रू. एक जिवंत कारतुस किंमती अंदाजे १०००/—रू. सह मिळुन आला. सदर हत्यारा बाबत आरोपीला परवाना विचारला असता त्याच्या जवळ कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे मिळुन आले नाही. आरोपीला जप्त मुद्देमालासह पुढील कायदेशीर कार्यवाही करीता पोलीस ठाणे कन्हान यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत, पोलीस हवालदार, नाना राऊत, ईकबाल शेख, पोलीस नायक वीरू नरड, मोनू शुक्ला, पोलीस शिपाई अभिषेक देखमुख यांचे पथकाने केली.




## जबरी संभोग

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 12/11/2022 ते 14/06/2023 पर्यंत फिर्यादी ही शाळा शिकत असतांना यातील आरोपी नामे– रूपेश पुरे, रा. मौजा 7 नं नाका कांद्री कन्हान यांची मैत्री झाली. दिनांक 12/11/2022 रोजी सायंकाळी आरोपी हा फिर्यादीला भेटला व म्हणाला कि, आपण सोबत राहु व लग्न करू दि. 11/11/2022 ला सायंकाळी फिर्यादीचे आई व वडिलांचा झगडा झाला व फिर्यादीला रागाचे भरात निघुन जा असे म्हटल्याने ती रागाचे भरात आरोपीचे घरी राहण्यास गेली. दि. 14/06/2023 पर्यंत 8 महिने आरोपीचे घरी राहली आरोपीने जबरदस्तीने 8 ते 10 वेळा संबंध केला फिर्यादीने लग्न कर असे म्हटले असता तो टाळाटाळ करत होता व संबंध नाही करू दिले तर मारत होता त्याचे त्रासाला कंटाळुन फिर्यादी ही दिनांक 14/06/2023 ला आईचे घरी आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 376(3), 376(2), (एन), 324, 506 भांदवि. सहकलम 4, 6 पोक्सो ॲक्ट सहकलम (1) (आर) (एस) (डब्लु) कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मकेश्वर पो.स्टे कन्हान हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**